डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – **cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in**

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ २८३ /२०२५ दि. २५/१२/२०२५

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, डोंबिवली वाहतूक उपविभागाचे हद्दीत दिनांक २६/१२/२०२५ रोजी शिवसेना व मित्र पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ मा. श्री. एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हे सम्राट चौक, डोंबिवली पश्चिम या ठिकाणी हजर राहुन जाहीर सभा घेणार आहेत. त्याअनुषंगाने डोंबिवली पश्चिम परिसरातील रोडवर पंडित दिनदयाळ रोडवरील एन के जी एस बी बँक ते सम्राट चौक येथे सदर सभेस मोठया संख्येने पक्षाचे कार्यकर्ते सहभागी होणार असुन वाहतुक कोंडी होऊन नागरीकांना त्रास होऊ नये याकरीता डोंबिवली रेल्वे स्टेशनवरून पंडित दिनदयाळ रोडने सम्राट चौकाकडे जाणारी व सम्राट चौकाकडून डोंबिवली पश्चिम रेल्वे स्टेशनकडे येणारी सर्व प्रकारची वाहतुक अन्य मार्गाने वळविण्यात येणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

प्रवेश बंद– डोंबिवली रेल्वे स्टेशन कडून पंडित दिनदयाळ रोडने सम्राट चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **दिनदयाळ चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग– सदरची वाहने महात्मा गांधी रोडने गुप्ते रोड, महात्मा गांधी रोड, सुभाष रोड अथवा कोपर रोडने इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद– कल्याण डोबिंवली महानगरपालिकेच्या पंडित दिनदयाळ रोडने, ठाकुरवाडी तसेच रेतीबंदर चौक, येथुन सम्राट चौक मार्गे डोंबिवली पश्चिम रेल्वे स्टेशनकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **सम्राट चौक, व्यंकटेश सोसायटी** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग– सदरची वाहने सम्राट चौक येथे डावीकडे वळण घेऊन नाना शंकर शेठ रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना **दि. २६/१२/२०२५ रोजी सकाळी ०९:०० वा. पासुन ते रात्रौ २२:०० वा. पावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण, विशेष शाखा, ठाणे
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग, पोनि डोंबिवली, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर